नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162


दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १८५ Issue - 185 | वार मंगळवार दि. २५ नोव्हेंबर २०२५ Blow- Tuesday Date 25 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## ज्येष्ठ अभिनेते पद्मभूषण धर्मेंद्र यांचे निधन

### बॉलीवूडच्या ‘ही मॅन’ला अखेरचा निरोप; मुलगा सनी देओलकडून मुखाग्नी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बॉलिवूडचे ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांनी वयाच्या ८९ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. कित्येक दिवसांपासून प्रकृती अस्वास्थामुळे धर्मेंद्र यांच्यावर त्यांच्या राहत्या घरी उपचार सुरू होते. अखेर आज त्यांची प्राणज्योत मालवली. पण, धर्मेंद्र यांच्या निधनाबाबत देओल कुटुंबीयांकडून माध्यमांना अधिकृत माहिती देण्यात आली नाही. पण, अवघ्या अर्ध्या तासांतच त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा थोरला लेक सनी देओलकडून त्यांना मुखाग्नी देण्यात आला.

धर्मेंद्र यांच्या जुहू येथील राहत्या घरात सोमवारी साधारणतः साडेबाराच्या सुमारास एक रुग्णवाहिका पोहोचली. त्यावेळी चाहत्यांच्या काळजाची धाकधूक वाढलेली. धर्मेंद्र यांची प्रकृती नाजूक असल्याचं सांगितलं जाऊ लागलं. त्यावेळी धर्मेंद्र यांच्या घरी नातेवाईकांची रांग लागली. धर्मेंद्र यांच्या मुलीही जुहूतल्या घरी पोहोचल्या. याच दरम्यान, धर्मेंद्र यांच्या घराबाहेर सुरक्षा वाढवण्यात आली आहे. तेवढ्याच विले पार्ले इथल्या पवनहंस स्मशानभूमीत हेमा मालिनी आणि ईशा देओल या दिसल्या. कुणाला काही कळण्यापूर्वीच सुपरस्टार धर्मेंद्र यांच्यावरील अंत्यसंस्कार उरकण्यात आलेले. अवघ्या अर्ध्या तासांतच धर्मेंद्र यांचा थोरला लेक सनी देओलनं मुखाग्नी दिला आणि तब्बल सहा दशकं सिनेसृष्टीवर राज्य करणारा बॉलिवूडचा ही-मॅन अनंतात विलिन झाला.

१२ नोव्हेंबर रोजी धर्मेंद्र यांना त्यांच्या कुटुंबाच्या विनंतीवरून ब्रीच कँडी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आलेला. तेव्हापासून त्यांच्यावर घरीच उपचार सुरू होते. पण, धर्मेंद्र यांच्यावर ज्यावेळी उपचार सुरू होते. तेव्हा त्यांच्याबाबत अनेक अफवा पसरवण्यात आलेल्या. त्यावेळी देओल कुटुंबियांकडून माध्यमांवर आगपाखड करण्यात आलेली. सनी देओलनं घराबाहेर उभ्या असलेल्या पॅपाराझींना फटकारलंही होते. सनी देओलचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झालेला. तसेच, ईशा देओल, हेमा मालिनी यांनीही सोशल मीडियावर पोस्ट करुन अफवांवर विश्वास न ठेवण्याचं आवाहन केलेलं. दरम्यान, असं असलं तरीसुद्धा अद्याप देओल कुटुंबीयांकडून धर्मेंद्र यांच्या निधनाबाबत अधिकृत निवेदन जारी करण्यात आलेलं नाही.

## टीईटी पेपरफुटी प्रकरणी मुख्य सूत्रधारासह १८ जणांना बेड्या; राज्यभर व्याप्ती वाढण्याची शक्यता

**कोल्हापूर पोलिसांची मोठी कारवाई**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर : राज्यभरात शनिवारी पार पडलेल्या शिक्षक पात्रता परीक्षा दरम्यान कोल्हापूर जिल्ह्यात पेपरफुटीच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश करण्यात आला आहे. कागल तालुक्यातील मुरगुड पोलिसांनी केलेल्या कारवाईत पाच शिक्षकांसह एकूण १८ जणांना अटक करण्यात आली असून या टोळीचा मुख्य सूत्रधार महेश गायकवाड यालाही पोलिसांनी जेरबंद केले आहे.

या प्रकरणी मुरगुड पोलीस ठाण्यात (चींर्सीव झेश्रळलश डींरींळेप) गुन्हा नोंदवण्यात आला आहे. टीईटी परीक्षा राज्यातील शिक्षक भरतीसाठी पहिली आणि अत्यंत महत्त्वाची पायरी मानली जाते. मात्र, हीच परीक्षा फोडून लाखो रुपयांची कमाई करणारी टोळी कोल्हापूरमध्ये सक्रिय असल्याचे उघड झाल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

**पाच शिक्षकांचाही समावेश**

गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी कागल तालुक्यातील सोनगे येथील एका फर्निचर मॉलवर छापा टाकला. येथे टीईटी परीक्षेचा छायांकित पेपर विद्यार्थ्यांना तीन लाख रुपयांना विकला जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. कारवाईदरम्यान सुरुवातीला नऊ जणांना ताब्यात घेण्यात आले. पुढील तपासात या रॅकेटचा व्याप वाढत जाऊन अटक केलेल्यांची संख्या १८ वर पोहोचली. अटक केलेल्यांमध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील पाच शिक्षकांचाही समावेश असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. त्यामुळे शिक्षण विभागानेही संबंधित शिक्षकांची माहिती मागवून पुढील कारवाईची तयारी सुरू केली आहे.

राज्यात लाखो उमेदवार शनिवारी टीईटी परीक्षा देत होते. अनेक परीक्षा केंद्रांवर परीक्षा सुरळीत सुरू असताना कोल्हापूरमध्ये मात्र पेपर फुटवण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती मिळताच शिक्षण विभागासह पोलिस यंत्रणा अलर्ट झाली. पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपींपैकी काही परीक्षार्थी शिक्षक असून त्यांचा या रॅकेटशी संबंध असल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे.

आरोपी सर्वजण कागल आणि राधानगरी तालुक्यातील असून आणखी काही संशयितांची नावे समोर येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. मुरगुड पोलीस आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाने रात्रभर तपास सुरू ठेवला असून रॅकेटची व्याप्ती राज्यभर पसरली असण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे पोलिसांनी सांगितले आहे.

## बिटकॉईन क्रॅश, डोनाल्ड ट्रम्प यांना मोठा धक्का, तब्बल ९८०० कोटी रुपये स्वाहा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचं मोठं नुकसान झालं आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्या संपत्तीत तब्बल ९८०० कोटी रुपयांची घसरण झाली आहे. ट्रम्प यांची नेटवर्थ १.१ अब्ज डॉलर्सनं घसरण झाली आहे. याचं प्रमुख कारण क्रिप्टोकरन्सी मार्केटमध्ये झालेली घसरण होय. प्रामुख्यानं बिटकॉईन क्रॅश झाल्यानं ट्रम्प यांना फटका बसला आहे.

फोर्ब्सच्या नव्या रिपोर्टनुसार डोनाल्ड ट्रम्प यांची संपत्ती ६.२ अब्ज डॉलर्स झाली आहे. जी यापूर्वी सप्टेंबर महिन्यात संपत्ती ७.३ अब्ज डॉलर्स होती. म्हणजेच ट्रम्प यांच्या संपत्तीत १.१ अब्ज डॉलर्सची घसरण झाली आहे. रिपोर्टनुसार ट्रम्प यांची कंपनी टीएमटीजीच्या सेअरमध्ये घसरण झाली आहे. ही कंपनी डीजेटी टिकरनुसार व्यवसाय करते.

गेल्या शुक्रवारी बिटकॉईनसह इतर क्रिप्टोकरन्सीमध्ये मोठी घसरण झाली आहे. त्यामुळं टीएमटीजी स्टॉकमध्ये १०.१८ डॉलर्सची घसरण झाली. ट्रम्प यांच्या कंपनीच्या शेअरमध्ये काही दिवस घसरण होत आहे. ट्रम्प मीडिया अँड टेक्नोलॉजी ग्रुपचे सेअर गेल्या एक महिन्यात ३५ टक्क्यांनी तर सहा महिन्यात ५५ टक्क्यांनी घसरले आहेत.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या संपत्तीत सप्टेंबर २०२५ पर्यंत मोठी वाढ पाहायला मिळत होती. गेल्या वर्षाच्या तुलनेत ३ अब्ज डॉलर्सची वाढ झाली होती. त्यामुळ डोनाल्ड ट्रम्प फोर्ब्सच्या अमेरिकेतील ४०० श्रीमंत लोकांच्या यादीत पोहोचले होते. ट्रम्प यांनी २०१ क्रमांक मिळाला होता. आता ट्रम्प यांच्या संपत्तीत १.१ अब्ज डॉलर्सची घसरण झाली आहे.

**पंतप्रधान मोदींच्या हस्ते समारंभ**

## अयोध्या राम मंदिराच्या शिखरावर भगवा ध्वज फडकणार






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी २५ नोव्हेंबर रोजी उत्तर प्रदेशातील अयोध्येतील श्रीराम जन्मभूमी मंदिराला भेट देणार आहेत. देशातील सामाजिक-सांस्कृतिक आणि अध्यात्मिक क्षेत्रातील हा एक महत्त्वाचा प्रसंग ठरणार आहे. सकाळी १० वाजताच्या सुमाराला, पंतप्रधान महर्षि वसिष्ठ, महर्षि विश्वामित्र, महर्षि अगस्त्य, महर्षि वाल्मिकी, देवी अहिल्या, निषादराज गुहा आणि माता शबरी यांच्याशी संबंधित मंदिरांचा समावेश असलेल्या सप्तमंदिराला भेट देतील. यानंतर ते शेषावतार मंदिरालाही भेट देणार आहेत.

सकाळी ११ वाजताच्या सुमाराला, पंतप्रधान माता अन्नपूर्णा मंदिराला भेट देतील. यानंतर, ते राम दरबार गर्भगृहात दर्शन आणि पूजा करतील, त्यानंतर ते रामलल्ला गर्भगृहात दर्शन करतील.

दुपारी १२ वाजण्याच्या सुमाराला, पंतप्रधान अयोध्येतील पवित्र श्रीराम जन्मभूमी मंदिराच्या शिखरावर समारंभपूर्वक भगवा ध्वज फडकवतील. ही घटना मंदिराचे बांधकाम पूर्ण झाल्याचे आणि सांस्कृतिक उत्सव तसेच राष्ट्रीय एकात्मतेच्या नव्या अध्यायाची सुरुवात झाल्याचे प्रतीक ठरणार आहे. या ऐतिहासिक प्रसंगी पंतप्रधान उपस्थितांना संबोधित देखील करणार आहेत.

हा कार्यक्रम मार्गशीर्ष महिन्यातील शुक्ल पक्षाच्या शुभ पंचमीला होईल, ही तिथी श्रीराम आणि सीतामाता यांच्या विवाह पंचमीच्या अभिजित मुहूर्ताशी देखील जुळत असून, हा दिवस दिव्य मिलनाचे प्रतीक आहे. याशिवाय यादिवशी नववे शीख गुरु तेग बहादुरजी यांचा हौतात्म्य दिन देखील आहे, गुरु तेग बहादुरजी यांनी १७ व्या शतकात अयोध्येत ४८ तास अखंड ध्यान केले होते, त्यामुळे या दिवसाचे आध्यात्मिक महत्त्व आणखी वाढते.

राम मंदिरावर फडकवण्यात येणारा ध्वज हा काटकोन त्रिकोणी ध्वज असून त्याची उंची दहा फूट तर लांबी वीस फूट आहे, या ध्वजावर तेजस्वी सूर्याची प्रतिमा असून ती भगवान श्रीराम यांचे अलौकिक तेज आणि शौर्याचे प्रतीक आहे. त्यावर कोविदार वृक्षाच्या प्रतिमेसह 'ओम' कोरलेला आहे. हा पवित्र भगवा ध्वज रामराज्यातील आदर्शांना मूर्त रूप देत प्रतिष्ठा, एकता आणि सांस्कृतिक वारशाचा संदेश देईल.

हा ध्वज पारंपरिक उत्तर भारतीय नागर स्थापत्य शैलीत बांधलेल्या शिखरावर फडकेल, तर दक्षिण भारतीय स्थापत्य परंपरेनुसार रचना केलेले मंदिराभोवती बांधलेले ८०० मीटरचे परकोटा, हे प्रदक्षिणागृह, मंदिराच्या स्थापत्यकलेतील विविधतेचे दर्शन घडवते.

मुख्य मंदिराच्या बाह्य भिंतींवर वाल्मिकी रामायणावर आधारित भगवान श्रीरामांच्या जीवनातील सूक्ष्म दगडी कोरीव कामातून ८७ प्रसंगांची मांडणी करण्यात आली आहे. तसेच भारतीय संस्कृतीतील कांस्य कास्ट केलेले ७९ प्रसंग भिंतींवर कोरलेले आहेत. हे सर्व घटक येणाऱ्या अभ्यागतांना एकत्रितपणे एक अर्थपूर्ण आणि शैक्षणिक अनुभव प्रदान करतील तसेच भगवान श्रीरामांच्या आयुष्यातील आणि भारताच्या सांस्कृतिक परंपरेतील सखोल अंतर्दृष्टी प्रदान करतील.

## ठाकरे बंधूंचं निवडणूक आयुक्तांना पत्र, दाखवल्या ६ ठळक चुका; मुंबई महापालिका निवडणुकांपूर्वी दुरुस्त करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सुरुवात झाली असून येत्या २ डिसेंबर रोजी मुंबई नगरपालिका निवडणुकांसाठी मतदान होणार आहे. त्यानंतर, जानेवारी महिन्यात राज्यातील मुंबईसह सर्वच महापालिकांच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. त्याच पार्श्वभूमीवर मतदार याद्यातील घोळ आणि मतदार यादीतील त्रुटी दूर करण्याची मागणी ठाकरे बंधूंनी केली आहे. मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना उबाठा प्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांची भेट यांना पत्र दिले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रभाग निहाय मतदारयादी विभाजनातील गंभीर त्रुटी व गोंधळ दूर करून निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणूकप्रक्रिया राबवण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी त्यांनी या पत्राद्वारे केली आहे.


शिवसेना ठाकरे गटाचे नेते आमदार आदित्य ठाकरे आणि मनसेच्या बाळा नांदगावकर यांनी राज्य निवडणूक आयुक्तांची भेट घेऊन आपलं गाऱ्हाणं मांडलं. तर, राज ठाकरेंचं पत्रही आयोगाला दिलं आहे.

निवडणूक आयोगाची मतदार याद्यांमध्ये गोंधळ कायम ठेवण्याची, आणि ते कधीही न निस्तरता, ते गोंधळ अधिक गुंतागुतीचे कसे होतील या बाबतीतलं जे सातत्य आहे त्याचं अभिनंदन करावं का खेद व्यक्त करावा हेच कळत नाही. असो पण पुन्हा एकदा निवडणूक आयोगाने मतदार यादीशी संबंधित घोळ तसाच ठेवला हे परत सिद्ध झालं. कसं ते सांगतो... असे म्हणत मतदार यादीतील घोळाची माहितीच राज ठाकरेंनी आपल्या पत्रातून निवडणूक आयोगाला दिली आहे.

आम्ही नुकतीच राज्य निवडणूक आयोगाला भेटून आलो, त्यांना उद्धव ठाकरे, राज ठाकरेंचं पत्रही दिलेलं आहे. निवडणुका आज होतील, उद्या होतील अजूनही काहीही नाही. हे सरकार वोट चोरून सर्व करत आहे, असे म्हणत आदित्य ठाकरेंनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. मुंबई महापालिकेसाठी वॉर्ड बाऊंडरी जाहिर झाली.

प्रारूप मतदार यादी ७ तारखेला येणार होती, ती १४ ला येणार सांगितलं, मग २० ला ती आली. भाजप सोडून सर्व विरोधी पक्षांनी यादी वाचन सुरू केलं आहे. जात-धर्म पाहून याद्या बदलून आलेल्या आहेत. सगळ्या वार्डात हे केलेलं नाही तर फक्त विरोधी पक्ष नेत्यांच्या यादीत हे केलेलं आहे, हा देशद्रोहाचा गुन्हा आहे. पारदर्शक निवडणूका म्हणता मग हे का? असा सवाल आदित्य ठाकरेंनी विचारला.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक




प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.
फक्त आमच्या कडेच



मतदार स्लिप
नांव व मतदान केंद्रासहीत
फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य
१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी, पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५.स्टिकर ६.पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी
नितीन हलसगी
मो. 9595427070 / 9270325070

## संपादकीय....

### सुपरस्टार हरपला

बॉलिवूडचे दिग्गज अभिनेते धर्मेंद्र यांनी जगाचा निरोप घेतला आणि ते अनंतात विलीन झाले. मुंबईतील विलेपार्ले येथील पवनहंस स्मशानभूमीत धर्मेंद्र यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तब्बस सहा दशकं सिनेसृष्टीवर अधिराज्य गाजवणाऱ्या सुपरस्टारला अखेरचा अलविदा करण्यासाठी जवळपास अख्खं बॉलिवूड उपस्थित होतं. हिंदी सिनेमांचे दिग्गज अभिनेते धर्मेंद्र यांनी वयाच्या ८९ व्या जगाचा निरोप घेतला. धर्मेंद्र यांचा थोरला लेक सनी देओलनं त्यांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. धर्मेंद्र काही वर्षांपूर्वी मुंबई सोडून गेले होते. शहराच्या गजबजाटापासून दूर असलेल्या त्यांच्या फार्महाऊसमध्ये ते राहत होते.



त्यामुळे ते फक्त शूटिंगसाठी मुंबईला येत असत. ते बऱ्याच काळापासून आजारी होते आणि त्यामुळे ते त्यांच्या कुटुंबाला भेटू शकत नव्हते. त्यांना याबद्दल खूप वाईट वाटलं. धर्मेंद्र हिंदी चित्रपटसृष्टीत प्रचंड प्रसिद्धी आणि ओळख मिळवली. त्यांना शेती आणि प्राण्यांची खूप आवड होती. म्हणूनच, ते मुंबईपासून दूर लोणावळा आणि खंडाळा दरम्यान असलेल्या त्याच्या फार्महाऊसमध्ये राहत होते. दरम्यान बॉलिवूडचा ही-मॅन म्हणून आेळखले जाणाऱ्या धर्मेंद्र यांनी सहा दशकांहून अधिक काळ एक समृद्ध कारकीर्द अनुभवली. त्यांनी ३०० हून अधिक सिनेमात काम केले आहे. अलिकडच्या काळात ते 'रॉकी और रानी की प्रेम कहानी', 'यमला पगला दिवाना', 'तेरी बातों मैं ऐसा उलझा जिया' अशा चित्रपटांमध्ये झळकले होते. २०१२ मध्ये चित्रपट विश्वातील त्यांच्या योगदानाबद्दल भारताचा तिसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मभूषण देऊन सन्मानित करण्यात आले होते. २००४ मध्ये बिकानेरवासीयांनी एका सुपरस्टारला निवडणुकीतील उमेदवार म्हणून प्रथमच आपल्यात मिसळताना पाहिले. धर्मेंद्र यांची लोकप्रियता इतकी होती की शक्तिशाली काँग्रेस नेते रामेश्वरलाल दुडी यांचा ६०,००० पेक्षा जास्त मतांनी पराभव करून ते लोकसभेत पोहोचले. पण लोकसभेत पोहोचल्यानंतर चित्र बदलू लागले. याच काळात त्यांच्या पत्नी आणि प्रसिद्ध अभिनेत्री हेमा मालिनी याही राज्यसभेच्या सदस्य म्हणून दिल्लीतच होत्या.

# भाजपची सत्ता आणण्यासाठी साम, दाम, दंड, भेद यापैकी जे लागल ते पुरवली जाईल

## भाजपने स्वबळावर निवडणुकीचा नारा दिला.... पालकमंत्री जयकुमार गोरे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भाजपचे सत्ता आणावी यासाठी साम, धाम, दंड, भेद, यापैकी जे लागल ते पुरवले जाईल. असे विधान सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी करमाळा येथे केले .



भाजप पदाधिकाऱ्यांसह उमेदवारासमोर बोलताना म्हणाले भाजपने स्वबळावर निवडणुकीचा नारा दिला आहे.. करमाळा नगर परिषदेवर भाजता नगराध्यक्ष निवडून आणण्यासाठी मी रश्मी बागल व विलासराव घुमरे यांच्यावर जबाबदारी सोपवलेली आहे. भाजपच्या क्रांतीच्या महिला आघाडीच्या उपाध्यक्ष रश्मी बागल यांच्या यांच्या निवासस्थानी पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी भाजप पदाधिकारी कार्यकर्ते उमेदवार यांची बैठक घेतली. घुमरे यांची नाराजी दूर नगराध्यक्ष पदासाठी घुमरे यांच्या पत्नी जयश्री घुमरे या इच्छुक होत्या दरम्यान भाजपने त्यांना तिकीट नाकारल्याने घुमरे समर्थक नाराज होते. पालकमंत्री यांच्या घरी जाऊन त्यांचे नाराजी दूर केली. दहशतमुक्ता क्लोज भाजपचा संकल्प. गोरे सह सत्तेचे केंद्र असलेल्या अकलूज चा विकास झाला असे वाटले होते. पण येथील नागरिकांच्या मूलभूत समस्या सुटल्या नाहीत. अकलूजच्या विकासाऐवजी दूरदर्शन झाले आहे आपण इथे कुणाची जिरवण्यासाठी आलो नाही.. पक्षाने दिलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी आलो आहे. सर्वसामान्य लोकांना कसली संदीप मिळत नसल्याने. भाजपने दर्शन मुक्त अकलूज करण्याचे संकल्प केला असल्याने सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोणे यांनी स्पष्ट केले.

# राज्यभरात साडेचार लाख उमेदवारांनी दिली टीईटी; परीक्षेत आठ विद्यार्थ्यांवर कारवाई!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य परीक्षा परिषदेतर्फे रविवारी राज्यभरात ' महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा ' ( महाटीईटी-२०२५ ) घेण्यात आली. परीक्षेत 'पेपर-१' व 'पेपर-२'साठी नोंदणी केलेल्या चार लाख ७५ हजार ६६९ विद्यार्थ्यांपैकी चार लाख ४६ हजार ७३० विद्यार्थ्यांनी दोन सत्रात परीक्षा दिली. छत्रपती संभाजीनगरमध्ये ३७ परीक्षा केंद्रांवरून परीक्षा घेण्यात आली. नोंदणी केलेल्या २४ हजार दोनशेपैकी विद्यार्थ्यांपैकी २२ हजार ७७१ विद्यार्थ्यांनी दोन सत्रांत परीक्षा दिली. परीक्षेला उपस्थितीचे प्रमाण ९३ टक्क्यांपेक्षा अधिक होते.

परीक्षा परिषदेतर्फे राज्यभरात विविध शहरातून ही परीक्षा घेण्यात आली. परीक्षा केंद्रावर सकाळपासून विद्यार्थी, पालकांची गर्दी होती. परीक्षा केंद्रांवर 'बायोमेट्रिक', 'फेस रिकग्निशन', 'फ्रिस्किंग' द्वारे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची नोंद करण्यात आली. त्यासह परीक्षा केंद्रांवर 'सीसीटीव्ही विथ एआय' सुविधेद्वारे नजर ठेवण्यात आली. राज्यभरात परीक्षेसाठी ४ लाख ७५ हजार ६६८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. ज्यामध्ये छत्रपती संभाजीनगर केंद्रावरील २४ हजार २०० परीक्षार्थीचा समावेश होता. शिक्षणाधिकारी प्राथमिक जयश्री चव्हाण, माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर यांच्यासह विविध अधिकाऱ्यांनी परीक्षा केंद्रांना भेट देऊन पाहणी केली.

शहरातील पोदार शाळेच्या केंद्राबाहेर काही परीक्षार्थीनी परीक्षा केंद्रांत प्रवेश दिला नसल्याचे सांगून संताप व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी सांगितले, की दुपारी दोन वाजता अनेक अडचणीतून केंद्रावर पोहचलो; परंतु दोन वाजता केंद्रात प्रवेश बंद करण्यात आला. आमची बाजू ऐकून घेण्यात आली नाही, असा दावा विद्यार्थ्यांनी केला.

राज्याच्या कंट्रोल रूममधून सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्यातील एका केंद्रावर दोन विद्यार्थी व बीड जिल्ह्यातील एका केंद्रावर सहा विद्यार्थी सातत्याने चर्चा करून प्रश्नांची उत्तरे लिहीत असल्याचे दिसून आले. त्यानुसार समवेक्षकांना संपर्क करून प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका समवेक्षकाकडे घेऊन संबंधित आठ विद्यार्थ्यांना तत्काळ परीक्षा केंदाच्या बाहेर जाण्यास सांगितले. संबंधित समवेक्षकांवर रीतसर चौकशी करून नियमानुसार प्रशासकीय कारवाई करण्याचे प्रस्तावित असल्याचे परीक्षा परिषदेने म्हटले आहे.




# २.५ लाखांपेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणाऱ्या लाडक्या बहिणींच्या १५०० रुपयांना लागला कायमचा ब्रेक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत ई-केवायसी अनिवार्य करण्यात आले असून, २.५ लाखांपेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असलेल्या महिलांचे अर्ज बाद होणार आहेत. ई-केवायसीमुळे सर्व माहिती उघड होणार असल्याने निकषांमध्ये न बसणाऱ्या महिलांचे लाभ बंद केले जातील. योजनेच्या लाभार्थ्यांना ३१ डिसेंबरपर्यंत ई-केवायसी पूर्ण करणे आवश्यक आहे.

लाडकी बहीण योजनेत महिलांची ई-केवायसी अनिवार्य करण्यात आली आहे. ज्या महिला ई-केवायसी करणार नाहीत, त्यांना योजनेचा लाभ मिळणार नाही. ई-केवायसीमध्ये ज्या महिला निकषांमध्ये बसत नाहीत, त्यांची माहिती मिळणार आहे आणि त्यांचे लाभ बंद केले जाणार आहेत. आता वार्षिक उत्पन्न जर २.५ लाखांपेक्षा जास्त असेल तर त्या महिलांना फटका बसणार आहे. या महिलांची माहिती ई-केवायसीमध्ये उघडकीस येणार आहे.

लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसीसाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. या मुदतीपूर्वी सर्व महिलांना ई-केवायसी करायची आहे. दरम्यान, या ई-केवायसीत ज्या महिलांनी निकषांबाहेर जाऊन योजनेचा लाभ घेतला आहे, त्यांचा लाभ बंद केला जाणार आहे.

लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना ई-केवायसी करणे गरजेचे आहे. ई-केवायसीमधून महिलांची सर्व माहिती मिळणार आहे. महिलांसोबत त्यांच्या पती किंवा वडिलांचीही ई-केवायसी होणार आहे. त्यामुळे या महिलांचे वार्षिक उत्पन्न, वय याबाबत सर्व माहिती मिळणार आहे. याच माहितीच्या आधारे अडीच लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या महिलांना योजनेचा लाभ मिळणार नाहीये.

लाडकी बहीण योजनेत जवळपास अडीच कोटींपेक्षा जास्त महिलांनी योजनेत लाभ घेतला आहे. या योजनेत निकषांबाहेर जाऊन देखील महिलांनी लाभ घेतला होता. त्यानंतर महिलांच्या अर्जांची पडताळणी करण्यात आली. यामधून ५२ लाख महिला अपात्र असल्याची माहिती समोर आली. त्यांचे लाभ बंद करण्यात आले.

आता ई-केवायसीनंतर लाडक्या बहिणींची सर्व माहिती प्राप्तिकर विभागाकडे दिली जाणार आहे. प्राप्तिकर विभाग या माहितीची पडताळणी करेल. यामध्ये ज्या लाभार्थ्यांचे उत्पन्न २.५ लाखांपेक्षा जास्त आहे त्यांना योजनेचा लाभ मिळणार नाहीये. त्यांचा लाभ कायमचा बंद केला जाणार आहे.

महाराष्ट्र सरकारने राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम नसणाऱ्या महिलांसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेचे लाभार्थी दोन कोटीपेक्षा अधिक महिला आहेत. त्यांना शासनाकडून प्रत्येक महिन्याला १५०० रुपयांचा निधी दिला जातो.

ऑक्टोबर महिन्याचा हप्ता लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा झाला आहे. आता नोव्हेंबर महिना संपण्यास काहीच दिवस बाकी आहेत. त्यामुळे लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना नोव्हेंबर महिन्याचा हप्ता मिळण्याची आतुरता लागली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात महिलांच्या खात्यात आर्थिक मदत जमा होण्याची शक्यता आहे. दरम्यान राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरु आहेत. पुढील काही दिवसांत जिल्हा परिषद आणि महानगरपालिकेच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळेच लाडकी बहीण योजनेचा नोव्हेंबर हप्ता पुढील आठ दिवसांतच लाभार्थींच्या खात्यात जमा केला जाण्याची शक्यता आहे.

# 'झिरो माईल लिटरेचर फेस्टिव्हल'च्या माध्यमातून वैचारिक कक्षा रुंदावतील : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : मनुष्याला संवेदना अभिव्यक्तीचे वरदान लाभले आहे. या अभिव्यक्तीसाठी त्याच्याकडे भाषा, साहित्य, पुस्तके ही माध्यमे आहेत. अभिव्यक्ती संपते तिथे संस्कृती संपते. त्यामुळे ही प्रगल्भ संस्कृती जपण्याची गरज असून हा सांस्कृतिक ठेवा जपण्याचे काम पुस्तकांच्या माध्यमातून होत असते. नागपूर पुस्तक महोत्सवांतर्गत होत असलेल्या 'झिरो माईल लिटरेचर फेस्टिव्हल'च्या माध्यमातून प्रगल्भता येऊन जाणिवा विस्तारित होतील. विविधांगी विषय या फेस्टिव्हलमध्ये मांडण्यात येतील. त्यातून वैचारिक कक्षा रुंदावून प्रगल्भ व्यक्तिमत्व तयार होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला.

नॅशनल बुक ट्रस्ट (एनबीटी) इंडियाच्या वतीने व महाराष्ट्र शासन आणि झिरो माईल यूथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नागपूर बुक फेस्टिव्हल २०२५ अंतर्गत चार दिवसीय 'झिरो माईल लिटरेचर फेस्टिव्हल'चे उद्घाटन आज मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. २३ आणि २४ तसेच २९ आणि ३० नोव्हेंबरदरम्यान हा साहित्य महोत्सव रेशीमबाग मैदानावर होत आहे. उद्घाटन कार्यक्रमाला शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ वर्ध्याच्या कुलगुरू व साहित्य अकादमीच्या उपाध्यक्ष डॉ. कुमुद शर्मा, लेखक व शिवकथाकार विजयराव देशमुख, एनबीटीचे अध्यक्ष प्रा. मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक, झिरो माईल यूथ फाउंडेशनचे मार्गदर्शक सत्यनारायण नुवाल, अध्यक्ष अजय संचेती, संचालक समय बनसोड आदी मान्यवर उपस्थित होते.

### चार दिवसीय 'फेस्टिव्हल'चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

मुख्यमंत्री म्हणाले की, नागपूर हे समृद्ध सांस्कृतिक वारसा असलेले शहर म्हणून ओळखले जाते. देशाला दिशा देणारे आणि देशाला दिशा देणाऱ्या अनेक घटनांचे साक्षीदार असलेले हे सांस्कृतिक शहर आहे. गोंड राजांनी सार्वजनिक ग्रंथालयाची परंपरा सुरू करून ज्ञानसंस्कृती रुजवली. भोसले काळात हिंदवी स्वराज्याच्या विस्तारात नागपूरने मोलाची भूमिका बजावली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे साहित्य हे अभिजात आहे. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, राजा बढे, राम शेवाळकर, महेश एलकुंचवार, सुरेश भट, ग्रेस, वि. भि. कोलते, ग. त्र्यं. माडखोलकर, मारुती चितमपल्ली, परशुराम खुणे यांच्यासारख्या अनेक साहित्यिकांनी या संस्कृतीला समृद्ध करण्याचे काम केले आहे. विदर्भाची भूमी ही भाषेच्या संगमाची भूमी आहे. मराठी आणि हिंदी साहित्य निर्मितीची समांतर समृद्ध परंपरा येथे पहायला मिळते. लिटरेचर फेस्टिव्हलच्या माध्यमातून नागपूरच्या सांस्कृतिक जडणघडणीत अत्यंत मोठा असा बदल होणार असल्याचे ते म्हणाले. माहिती ही ज्ञानामध्ये परिवर्तित होत नाही तोवर ती केवळ माहिती असते. त्यामुळे माहितीकडून ज्ञानाकडे जायचे असेल तसेच ज्ञानी म्हणून नावलौकीक मिळवायचा असेल तर पुस्तकांशिवाय पर्याय नाही. तरुण पिढीपर्यंत पुस्तके पोहोचविण्याची गरज असल्याचेही ते पुढे म्हणाले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी नागपूर बुक फेस्टिव्हलच्या यशस्वी आयोजनाबद्दल कौतुक केले. एनबीटी देशभरात वाचनसंस्कृती पुनर्स्थापित करण्याचे उत्कृष्ट कार्य करीत आहे. या उपक्रमाचा एक भाग असलेले नागपूर पुस्तक महोत्सव नवी उंची गाठेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

तत्पूर्वी, मुख्यमंत्री फडणवीस यांनी विविध पुस्तक प्रकाशनांच्या स्टॉल्सला भेट दिली. मुख्यमंत्र्यांनी बालमंडपला भेट देऊन विद्यार्थ्यांशीही संवाद साधला.




वाचन संस्कृती जोपासण्याची गरज – राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर

शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर म्हणाले की, आजच्या काळात वाचनाची गरज सर्वाधिक आहे आणि त्या जाणिवेतून हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. डिजिटल माध्यमामुळे वाचनाला धोका निर्माण होत असल्याची चिंता व्यक्त होत असल्याच्या पार्श्वभूमीवर या पुस्तक महोत्सवाचे महत्त्व अधिक आहे. वाचन संस्कृती जोपासण्याची गरज आहे. या महोत्सवात ३०० हून अधिक प्रकाशक आणि १५ लाखांहून अधिक पुस्तके उपलब्ध आहेत. परिसरातील विद्यार्थी आणि नागरिकांना याचा मोठा फायदा होईल. नागरिकांनी या महोत्सवाला भेट देण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. शिवकथाकार विजयराव देशमुख यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले. एनबीटीचे अध्यक्ष प्रा. मिलिंद सुधाकर मराठे यांनी प्रास्ताविक केले. वेदिका मिश्रा यांनी सूत्रसंचालन केले. युवराज मलिक यांनी आभार मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# मी पंढरपूरला जाणार अशा वावड्या विरोधक उठवितात

## माढा हीच माझी कर्मभूमी आहे. ती आयुष्यभर राहील; आ. अभिजीत पाटील यांची स्पष्टोक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा येथे विठ्ठल प्रतिष्ठान आयोजित कृषी व सांस्कृतिक महोत्सव २०२५ या कार्यक्रमात आनंद शिंदे, फोक प्रबोधन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात सत्काराच्या वेळी आमदार पाटील बोलत होते.







यावेळी ते पुढे म्हणाले, कृषी व सांस्कृतिक महोत्सवाचे हे दुसरे वर्ष आहे. यापुढे प्रत्येक वर्षी माढा या ठिकाणीच हा महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीआधी हा महोत्सव साजरा करण्यात आला. त्याआधीच्या वर्षी तो पंढरपूर येथे साजरा करण्यात आला होता. यावेळी बोलत असताना गायक आनंद शिंदे यांनी दरवर्षी हा महोत्सव भरवावा आणि तो माढा येथेच असावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

यानंतर आमदार पाटील म्हणाले, काहींनी आपल्याबाबत मी पंढरपूरला जाणार अशा वावड्या उठवायला सुरुवात केली आहे. पण माढा हीच माझी कर्मभूमी आहे आणि ती आयुष्यभर राहील. जे मला भीत आहेत, तेच मी पंढरपूरला जाण्याचा अपप्रचार करीत आहेत. पण त्यांना पुन्हा एकदा पाडल्याशिवाय मी राहणार नाही, असा निर्धार त्यांनी या वेळी व्यक्त केला.

फोक प्रबोधन कार्यक्रमात जुनी भारूड, ओव्या, हालगी, अशा पारंपरिक वाद्य व गाण्यांवर माढेकरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आनंद घेतला.

यावेळी माजी झेडपी सदस्य भारत शिंदे, राष्ट्रवादीचे माजी तालुकाध्यक्ष भाऊ महाडिक, माजी झेडपी सदस्य आनंदराव कानडे, ज्योती कुलकर्णी, विनंती कुलकर्णी भाऊसाहेब महाडिक, रावसाहेब देशमुख, बालाजी पाटील, नीलेश पाटील, आबा साठे, माजी सभापती विद्याताई शिंदे, माजी नगरसेवक शहाजी साठे, माजी पं. स. सदस्य दीपक देशमुख, बापूसाहेब जाधव, कुरण गिड्डे, संदीप खारे उपस्थित होते.

---

# श्री विठ्ठल कारखान्यावर कर्मवीर औदुंबर अण्णांची १०२ वी जयंती साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील बेलो नगर गोसावी येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना येथे पंढरपूर तालुक्याच्या कृषी औद्योगिक क्रांतीचे जनक, संस्थापक चेअरमन कर्मवीर स्वर्गीय औदुंबर रावजी (अण्णा) पाटील यांची १०२ वि जयंती साजरी करण्यात आली.

कर्मवीर स्वर्गीय आंदोलनाची स्मरण कायम ऊर्जादायी असून त्यांनी पंढरपूर तालुक्यातील समृद्धीसाठी आपली संपूर्ण आयुष्य समर्पित केले व गुरसाळे येथील महाराणा वरती श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याची मुहूर्तमेढवून पंढरपूर तालुक्यात कृषी व औद्योगिक क्रांती घडवून आणली. औदुरांना पाटील यांनी आपल्या धडाडीच्या नेतृत्वातून पंढरपूर तालुका सहकार्याची नवी दिशा दिली. व शेतकऱ्यांच्या श्रमाला योग्य मूल्य मिळावे व त्यांच्या कुटुंबाचा उंबरठा समृद्ध व्हावा या देहाने त्यांनी उभारलेली श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना आजही ग्रामीण भागातील उद्योग विकासाचा भक्कम पाया ठरला आहे. शेतकरी कामगार आणि युवकांना त्यांचे विचार आजही प्रेरणादायी आहेत. तालुक्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी त्यांनी केलेले अथक प्रयत्न हीच त्यांची खरी ओळख आहे. याप्रसंगी कारखाना कार्यस्थळावरील कर्मवीर स्वर्गीय औदुंबर रावजी अण्णा पाटील यांचे पूर्णाकृती पुतळ्याची विधीपूर्वक पूजा कारखान्याची चेअरमन आमदार अभिजीत आबा पाटील, तू जेष्ठ संचालक दिनकर (दाजी) आदिनाथ चव्हाण, व महेश महादेव खटके यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

तसेच कारखान्याची चेअरमन अभिजीत आबा पाटील यांची पिताश्री स्वर्गीय अँड धनंजय विठ्ठलराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले.

सदर कार्यक्रमास कारखान्याची संचालक सर्वश्री कालिदास साळुंखे, तज्ञ संचालक अशोक तोंडले, निमंत्रित संचालक गणेश ननवरे कारखान्याचे सर्व अधिकारी कर्मचारी वर्ग हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्व संचालक व मान्यवरांनी याप्रसंगी कर्मवीर फोन नंबर पाटील यांना आदरांजली वाहून विनम्र अभिवादन करण्यात आले.

---

# राष्ट्रवादी कडुन खरोसा जिल्हा परीषद निवडणूक लढण्यासाठी आशोक जगताप आग्रही



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील खरोसा जिल्हा परिषद गट हा सर्वसाधारण पुरुष आरक्षित असल्याने कुमठा गावचे उपसरपंच अशोक जगताप हे राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने खरोसा जिल्हा परिषद निवडणूक लढण्यासाठी आग्ररी असल्याचे चित्र आहे.

कुमठा गावचे ऊपसरपंच अशोक जगताप यांनी आपल्या कुमठा गावातून गेल्या वीस वर्षापासून सक्रिय राजकारण करत ग्रामपंचायत च्या माध्यमातून ग्रामपंचायत सदस्य असो वा ग्राम पंचायत उपसरपंच अशा पदावर काम करताना अनेक लोकहिताची कामे केली असुन होउ घातलेल्या आगामी स्थानिक स्वराज संस्थेच्या निवडणुकीत खरोसा जिल्हा परीषद राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाकडुन निवडणुक लढवण्यासाठी उपसरपंच आशोक जगताप यांनी पक्षाकडे मागणी केली असुन, राष्ट्रवादी पक्षाने मला खरोसा गटातुन जिल्हा परीषद निवडणुक लढण्याची संधी द्यावी भविष्यात मी खरोसा जिल्हा परीषद गटातील गावांचा सर्वांगिण विकास करण्याचा संकल्प असल्याच यावेळी उपसरपंच आशोक जगताप यांनी सांगितले.

यावेळी राष्ट्रवादीचे युवक जिल्हाध्यक्ष भरतभाउ सुर्यवंशी औसा युवक तालुकाध्यक्ष बाळासाहेब जाधव, जिल्हा उपाध्यक्ष जिवन पाटील, आत्माराम साळुंके .वसिम बोपले, विनोद झीरमीरे सह अनेक पदाधिकार्यांनी आशोक जगताप यांच्या उमेदवारीसाठी आग्रह धरला आहे.

---

# प्रा. रविंद्र गुलाबराव चाटे यांना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे साहित्यरत्न राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे/बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : प्राध्यापक रवींद्र गुलाबराव चाटे हे मूळचे दरेगाव तालुका सिंदखेडराजा बुलढाणा जिल्ह्यातील असून खामगाव तालुक्यातील लाखनवाडा येथे महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालय येथे ते प्राचार्य पदावर कार्यरत आहे. प्राध्यापक रवी चाटे सर हे महाराष्ट्रभर व्याख्याते म्हणून प्रसिद्ध आहेत तसेच उत्कृष्ट निवेदक म्हणून त्यांची ख्याती आहे. ५०० च्या वर त्यांच्या स्व लिखित कविता सुद्धा आहेत. काहीच दिवसांमध्ये जीवन प्रवास हा कविता संग्रह त्यांचा प्रकाशित होणार असून, काही दिवसापूर्वी या अगोदर गरुड फाउंडेशन राहुरी अहिल्यानगर यांच्याकडून राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सुद्धा मिळाला आहे.



जिल्ह्यातील साखरखेर्डा तालुका सिंदखेडराजा येथे सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त व दैनिक भारत संग्राम तसेच स्वर्गीय मधुकर खंडारे व समाजभूषण अर्जुन दादा गवई यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने राज्यस्तरीय पुरस्कारासाठी परिचय प्रस्ताव मागविण्यात आले होते .या मध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे साहित्यरत्न राज्यस्तरीय पुरस्कारासाठी राज्यभरातून जवळपास ७० प्रस्ताव मुख्य आयोजक तथा निवड समिती कडे प्राप्त झाले होते .यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे साहित्यरत्न राज्यस्तरीय पुरस्कार हा उत्कृष्ट लेखक साहित्यिक प्रा.मा.रविंद्र गुलाबराव चाटे.मु. पो. दरेगाव ता. सिंदखेडराजा जि. बुलढाणा यांना जाहीर करण्यात आला आहे तसे मुख्य आयोजक मा.सचिन खंडारे संपादक, पत्रकार तथा निवड समिती अध्यक्ष विकास सुखधाने साहित्यिक लेखक,कवी यांनी निवड पत्राद्वारे त्यांना कळविले आहे.लवकरच हा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा डिसेंबर महिन्यात अनिकेत सैनिक स्कूल साखरखेर्डा ता.सिंदखेडराजा जि.बुलडाणा येथे मोठ्या संख्येने पार पडणार असून प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रा. मा.रविंद्र गुलाबराव चाटे यांना प्रदान करण्यात येणार आहे जाहीर झालेल्या पुरस्कारा बद्दल साहित्यिक क्षेत्रातून प्रा. रविंद्र गुलाबराव चाटे यांचे अभिनंदन केले जात आहे.

---

# सोलापुरात ऊस आंदोलन पेटले.. गव्हाणीत उड्या मारून कारखाना पाडला बंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बार्शी/प्रतिनिधी : शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंकर गायकवाड यांचे नेतृत्वाखाली २० नोव्हेंबर रोजी ऊसाला पहिली उचल ४००० द्या व दर जाहीर केल्याशिवाय राज्यातील साखर कारखान्यांनी उसाचे गाळप करू नये यासह विविध मागण्यांसाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना विविध कारखाने, पोलीस स्टेशन व तहसील कार्यालया मार्फत निवेदने पाठवली होती. त्या निवेदनात ऊसाची ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्या, काटा मारणाऱ्या तसेच ऊस दर जाहीर न केलेल्या व मागील ऊस बिले थकीत असलेल्या कारखान्यांवर दिनांक २३ नोव्हेंबर पासून आंदोलने करणार असल्याचे जाहीर केले होते, त्याप्रमाणे आज बार्शी तालुक्यातील निमजाई कारखान्याच्या गव्हाणीत उतरून ठिय्या मांडत कारखाना बंद करण्यात आला.



त्यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटना जिल्हाध्यक्ष विजय रनदेवे, बार्शी तालुका अध्यक्ष हनुमंत कापसे, उमेश यादव, मुसा मस्के, दत्ता कापसे, तानाजी कापसे, ज्ञानेश्वर पवार, विजय पवार, नारायण डिसले, बालाजी डिसले, किसन डिसले, दयानंद ढेंगळे, नितीन कापसे, प्रदीप पाटील आदींसह शेतकरी उपस्थित होते.

यावेळी गायकवाड म्हणाले की, ऊस उत्पादनाचा खर्च गगनाला भिडलेला असताना कारखानदार मात्र शेतकऱ्यांचा ऊस फुकट भावात लुटत आहेत ते तात्काळ थांबवा अन्यथा वैतागलेला शेतकरी कारखाने पेटवल्याशिवाय राहणार नाही असा खणखणीत इशाराही यावेळी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना गायकवाड यांनी दिला.

---

**दहा प्रभागातील एकूण वीस नगर सेवक पदाच्या उमेदवारांचा प्रचाराचा शुभारंभ ; आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत रॅली**

# नळदुर्ग नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीतील भाजपाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बसवराज धरणे व नगरसेवक पदाच्या उमेदवारांचा प्रचाराचा शुभारंभ रॅलीने व जाहीर सभेने



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/एस.के. गायकवाड : तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकतील भारतिय जनता पार्टीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बसवराज धरणे व एक ते दहा प्रभागातील एकूण वीस नगर सेवक पदाच्या उमेदवारांचा प्रचाराचा शुभारंभ तुळजापूर विधानसभेचे विद्यमान आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील मुख्य रस्त्यावरून भव्य दिव्य अशी रॅली काढून व जाहीर सभा घेऊन करण्यात आला.

नळदुर्ग नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत नामनिर्देशन अर्ज काढून घेण्याच्या शेवटच्या तारखे नंतर प्रचाराच्या रनधुमाळीला सुरुवात झाली असून दि.२२नोव्हेंबर रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या सभेने राष्ट्रवादी काँग्रेसने आपल्या प्रचाराला सुरुवात केली तर पाठोपाठ दिनांक २३ नोव्हेंबर रोजी भारतीय जनता पार्टीच्या उमेदवारांनी तुळजापूर विधानसभेचे विद्यमान आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातून भव्य रॅली काढून व जाहीर सभा घेऊन आपल्या प्रचाराचा नारळ फोडला. दिवसेंदिवस निवडणुकीचे वातावरण शहरामध्ये तापत असून प्रत्येकाने आपापल्या परीने प्रचाराला सुरुवात केली आहे दि.२३ नोव्हेबर २२५ रोजी नळदुर्ग शहरातील राष्ट्रीय महामार्ग लगत असलेल्या धरणे किराणा स्टोअर समोर नळदुर्ग नगर परिषदेच्या प्रत्येक प्रभागातील उमेदवार व मतदार जमा करून शहरातील मुख्य रस्त्याने रॅलीला सुरुवात करण्यात आली या रॅलीचे येथील ऐतिहासिक किल्ला गेट जवळ जाहीर सभेत रुपांतर झाले या सभेत बोलताना तुळजापूर विधानसभा मतदारसंघाचे लाडके आमदार राणाजगजीत सिंह पाटील म्हणाले की ही निवडणूक नळदुर्ग शहराच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची निवडणूक असून भारतीय जनता पार्टी जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन केवळ विकासाच्या मुद्द्यावर ही निवडणूक लढवीत आहे सर्वसामान्य जनतेची समस्यांची जाणीव असलेले सामाजिक राजकीय वारसा लाभलेले युवा कार्यकर्ते बसवराज धरणे यांना भाजपाने नगराध्यक्ष पदासाठीची उमेदवारी दिली असून त्यांच्या बरोबरच एक ते दहा प्रभागातून एकून वीस उमेदवारांना सोशल इंजिनिअरिंगच्या माध्यमातून सर्व जाती धर्मातील उमेदवारांना न्यायिक भावनेने उमेदवारी दिलेली आहे तेव्हा नळदृर्ग शहराच्या विकासाकरिता जनतेने भाजपा शिवसेना शिंदे गट महायुतीच्या उमेदवाराच्या पाठीमागे खंबीर उभे राहून भाजपा शिवसेना व मित्रपक्ष महायुतीला प्रचंड मताने विजयी करून महायुतीच्या ताब्यात नगर परिषदेची सत्ता द्यावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले याप्रसंगी भाजपाचेमाजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, नय्यरपाशा जहागीरदार, दत्तात्रय दासकर,लहुजी शक्ती सेनेचे शिवाजी गायकवाड, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बसवराज धरणे आदींची ही समय सूचक पर भाषणे झाली या सभेचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन विनायक अहंकारी यांनी केले.

यावेळी भाजपाचे युवा नेते सुनील चव्हाण, साहेबराव घुगे सिद्धू अण्णा कोरे, अॅड. दीपक आलुरे, दत्तात्रय राजमाने, अंगद जाधव, विलास राठोड, राजा ठाकूर, किशोर धुमाळ प्रकाश बनसोडे, दत्ता बनसोडे, किशोर नळदुर्गकरसह सर्व नगरसेवक पदाचे उमेदवार, युवा कार्यकर्ते, महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तिरुपती श्री पद्मावती देवी ब्रह्मोत्सवमध्ये सोलापुरातील वारकरी दिंडी सोहळा

## वारकरी दिंडीमध्ये सांस्कृतिक, पारंपारिक विविध वारकरी खेळ सादर








**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : तिरुपती श्री पद्मावती देवी ब्रह्मोत्सव मध्ये प्रथमच सोलापुरातील श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी सांप्रदायिक मृदुंग वादन शिक्षण संस्था व श्री सिद्धू रोड सांस्कृतिक सेवा भजनी मंडळ यांचा रथासमोर वारकरी दिंडी सोहळा संपन्न झाला. अखिल भाविक वारकरी मंडळ प्रदेशाध्यक्ष व उत्कृष्ट मृदंग वादक ह भ प ज्योतीराम महाराज चांगभले व सोलापुरातील प्रसिद्ध गायक व ह भ प लक्ष्मण महाराज देविदास यांच्या मार्गदर्शनाखाली व दिंडी सोहळ्याचे नियोजन केले होते महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे सोलापूर जिल्ह्यात भगवान भोसरी पांडुरंग परमात्म्याची मंदिर आहे म्हणून सोलापुरातील या मंडळाला मान मिळाला या गावांमध्ये वारकरी दिंडीमध्ये वारकरी पाऊल पुढे कडवट असे विविध वारकरी खेळ सादर करून सांस्कृतिक पारंपारिक वारकरी खेळ चे परंपरा जोपासली व ह भ प लक्ष्मण महाराज देविदास यांनी तेलुगु गीत गाऊन आपली सेवा केली या कार्यक्रमासाठी सोलापूरचे माजी महापौर श्री जनार्दन करमपुरी यांचे सहकार्य लाभले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अनुराधा देविदास, धीरज देविदास राकेश देविदास प्रणिती चांगभले कौतुक चांगभले वर्षाराणी चांगभले अजय मोरे कुमार गायकवाड सोनवणे, सोमनाथ कोरे, धनाजी लोहार शरयू जगताप व माशाळ, सुरवशी दक्ष वारे गणेश शेटे सुरवसे कृष्णा वाघमोडे आदित्य इंगळे वेदांत ठाकरे समर्थ जगताप, ही दिंडी सोहळ्यासाठी उपस्थित होते.

# चिराडपाडा ग्रामस्थांचा विकासासाठी एल्गार! स्वतंत्र ग्रामपंचायत प्रस्तावाला बहुमताने मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : गावाच्या सर्वांगीण आणि गतिमान विकासाचे ध्येय ठेवत भिवंडी तालुक्यातील चिराडपाडा येथिल ग्रामस्थांनी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापनेसाठी एकमुखी निर्णय घेतला आहे. सरपंच रिंकल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद शाळेत आयोजित विशेष ग्रामसभेत स्वतंत्र ग्राम पंचायत स्थापनेचा प्रस्ताव बहुमताने मंजूर करण्यात आला. अनेक वर्षांपासूनची ग्राम स्थांची मागणी आता प्रत्यक्षात येण्याच्या मार्गावर आहे. एकजुटीने विशेष ग्रामसभा पार पडली ,सोमवारी झालेल्या या सभेत ग्रामविकास अधिकारी काशीनाथ माळी आणि ग्रामसेवकांच्या उपस्थितीत ग्राम स्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. गावाच्या भविष्यासाठी घेतल्या जाणाऱ्या या महत्वाच्या निर्णयाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत एकजूट दाखवली. स्वतंत्र ग्रामपंचायतीसाठी उत्स्फूर्त समर्थन देण्यात आले चिराडपाडा सध्या पिसे-चिराडपाडा ग्रुप ग्रामपंचायतीचा भाग आहे. स्वतंत्र ग्रामपंचायत झाल्यानंतर गावाला थेट निधी उपलब्ध होईल, विकासकामांची गती वाढेल, तसेच पाणी, रस्ते, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या मूलभूत सुविधांच्या अंमलबजावणीला चालना मिळेल, असे ग्रामस्थांनी सांगितले. प्रस्ताव मांडल्यानंतर उपस्थित सर्वांनी टाळ्यांच्या गजरात त्याला मंजुरी दिली. ग्रामविकास अधिकारी काशीनाथ माळी यांनी हा प्रस्ताव तातडीने उच्च प्रशासनाकडे पाठविण्याची माहिती दिली असून



मंजुरीसाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही वेगाने केली जाईल, असे आश्वासन दिले. ग्रामसभेच्या यशस्वी आयोजनासाठी गावातील तरुण आणि महिलांनी केलेल्या मेहनतीचे सर्वत्र कौतुक होत आहे. गावाच्या एकजुटीचा हा निर्धार आता तालुक्यातही चर्चेचा विषय ठरला आहे. स्वतंत्र ग्रामपंचायतीसाठीचा चिराडपाडा ग्रामस्थांचा हा 'एल्गार' पुढे प्रशासनाकडून किती वेगाने पूर्ण होतो, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची 'अ‍ॅग्रो व्हिजन' कृषी प्रदर्शनास भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नागपूर : मध्य भारतातील शेतकऱ्यांच्या आकर्षणाचे केंद्र ठरलेल्या आणि नागपुरात मागील तीन दिवसांपासून सुरु असलेल्या 'ग्रो व्हिजन -२०२५' या कृषी प्रदर्शनीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी दुपारी भेट दिली. या भेटीत त्यांनी प्रदर्शनीतील कृषी उत्पादने आणि पूरक उद्योगांच्या दालनांची पाहणी करून शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाबाबत माहिती जाणून घेतली.

यावेळी 'ग्रो व्हिजन' कृषी प्रदर्शनाच्या कार्यालयात आयोजित छोटेखानी कार्यक्रमात या प्रदर्शनाचे प्रणेते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, बारामती ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे विश्वस्त प्रतापराव पवार, ॲग्रो व्हिजन फाऊंडेशनचे अध्यक्ष रवी बोरटकर तसेच ॲग्रो व्हिजन सल्लागार परिषदेचे चेअरमन डॉ. सी. डी. मायी हे मान्यवर उपस्थित होते. ॲग्रो व्हिजनचे हे आतापर्यंतचे सोळावे प्रदर्शन आहे. याशिवाय फाऊंडेशनला १० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल तयार करण्यात आलेल्या कॉफी टेबल बुकचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रदर्शनातील विविध संस्था आणि कंपन्यांच्या दालनांना भेट दिली. विशेषतः मुख्यमंत्र्यांनी शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाबाबत माहिती जाणून घेतली.




# अक्कलकोट भावसार क्षत्रिय समाजाचा भारतीय जनता पक्षाला जाहीर पाठिंबा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : अक्कलकोट नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अक्कलकोट भावसार क्षत्रिय समाजाची बैठक आयोजित करण्यात आली होती सदर बैठकीत भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार श्री मिलन कल्याणशेट्टी तसेच भाजप पुरस्कृत सर्व नगरसेवक यांना समाजाच्या वतीने पूर्ण पाठिंबा देण्यात आले, यावेळी बोलताना समाजाचे अध्यक्ष कृष्णात माळवदकर यांनी केंद्रात व राज्यात भाजपची सत्ता आहे अक्कलकोट नगरपरिषदेवर पण भाजपची सत्ता आणण्याचे आवाहन केले. तसेच समाजाचे सचिव यांनी बोलताना प्रत्येकानी जबाबदारी घेऊन पक्षासाठी पूर्ण वेळ देण्याचे तसेच मतदारांना समक्ष भेटून भाजपाला मतदान करण्याचे आवाहन केले व समाजाचे खंबीर नेतृत्व व प्रभाग क्रमांक ६ ब चे उमेदवार यशवंत धोंगडे यांनी भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्ष व सर्व भाजप पुरस्कृत नगरसेवक पदाचे उमेदवारांना मोठ्या मताधिक्यांनी निवडून देण्याचे आवाहन केले. यावेळी समाजाचे अध्यक्ष श्री कृष्णात माळवदकर, उपाध्यक्ष श्री मनोहर धोंगडे, श्री संजय पुकाळे, सचिव आतिश कटारे, विलास धोंगडे,राजकुमार झिंगाडे,दामोदर शिमगे , दत्तात्रय कटारे, अरुण महिंद्रकर, मनोज शिंपी, प्रशांत कटारे, राहुल मुसळे, लक्ष्मीकांत पुकाळे, राहुल खमीतकर, महेश धोंगडे, विवेक मुसळे आदी समाज बांधव उपस्थित होते.

# लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयात कृषी क्षेत्रातील उच्च शिक्षण संधी व व्याख्यान संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्रीराम ग्रामीण संशोधन आणि विकास संस्था संचालित लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयात कृषी क्षेत्रातील उच्च शिक्षण संधी या विषयावर मार्गदर्शन व्याख्यान आयोजित करण्यात आले होते कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व सरस्वती पुजनाने झाली या कार्यक्रमाला व्याख्यान म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी कुमारी सुयोग थोरात ( एम.बी.ए) हे लाभले होते तो ज्ञानबा सोपानराव मौजे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग बालेवाडी येथे एमबीए करत आहे. त्याचबरोबर तो सध्या बारामती ग्रो पशुखाद्य



जॉब करत आहे त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कृषी व्यवसाय व्यवस्थापन शाखे बद्दल माहिती सांगितली तसेच कृषी व्यवसाय व्यवस्थापन क्षेत्रात पदवीधारांसाठी मार्केटिंग तसेच शासकीय नोकरी व यशस्वी उद्योजक होण्याबाबतचे मार्गदर्शन केले त्यासोबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कृषी क्षेत्रातील उच्च शिक्षणासाठी तयारी कशी करावी व विद्यार्थ्यांनी त्यासाठी कोणकोणत्या स्पर्धा परीक्षा द्याव्या लागतात. तसेच या परिसरामाच्या माध्यमातून विद्यार्थी कोणकोणत्या श्रेष्ठ होऊ शकतात याविषयी मार्गदर्शन केले यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्र कृषी शिक्षण परिषदेमार्फत व राष्ट्रीय कृषी संशोधन परिषदेमार्फत घेण्यात येणाऱ्या एमबीए एग्रीकल्चर व पीएचडी कृषी या परीक्षांविषयी यामध्ये उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक तयारी विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मार्गदर्शन करत असताना तुम्ही तुमच्या स्वप्नावर ठाम रहा असे आव्हानही केले व कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राध्यापिका निशा पाटील मॅडम होत्या व कार्यक्रमास प्राध्यापक स्मिता धायगुडे प्राध्यापक स्मिता हरे प्राध्यापक रोहिणी सोमवंशी तसेच महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन द्वितीय वर्षाची साक्षी देवकर व आभार सुर्वे यांनी केले.

## आजच्या तरुणाईला मार्गदर्शन करून त्यांना विधायक कार्यासाठी प्रेरित करण्यासाठी विविध उपक्रमातून जनजागृती कार्यक्रम

# स्वेरीत 'जागरूक नागरिक- डिजिटल सुरक्षा, रस्ता सुरक्षा व महिला सुरक्षा' हा जनजागृती उपक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आजच्या तरुणाईला मार्गदर्शन करून त्यांना विधायक कार्यासाठी प्रेरित करण्यासाठी स्वेरीतील राष्ट्रीय सेवायोजनेतील स्वयंसेवकांनी पुढाकार घेवून विविध उपक्रमांच्या माध्यमातून अलीकडेच एक जनजागृती कार्यक्रम घेतला. स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी सुंदर अशा लघुनाटीकेच्या माध्यमातून समाजातील गुन्हेगारी थोड्या का प्रमाणात होईना कमी करण्यासाठी जनजागृती केली. ही लघुनाटिका पाहून गुन्हेगारीला आळा बसण्यास नक्कीच मदत होईल. विद्यार्थ्यांची ही जनजागृतीपर लघुनाटिका पाहण्यासाठी पंढरपूर येथील पोलिस बंधूही स्वेरीत आले होते. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध भूमिकांमधून समाजात चांगला संदेश पोहोचवला आहे. विद्यार्थ्यांनी केलेल्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

पोलीस विभाग, पंढरपूर आणि स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागरूक नागरिक- डिजिटल सुरक्षा, रस्ता सुरक्षा व महिला सुरक्षा' हा जनजागृती कार्यक्रम गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये घेण्यात आला. स्वेरीतील सर्वगुणसंपन्न असलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या लघुनाटिके मधील केलेल्या संवादातील चढ-उतार, चेहऱ्यावरील हावभाव, वस्तुस्थितीचे दर्शन यामुळे ही लघुनाटिका अधिक प्रभावी ठरते. विद्यार्थ्यांच्या या कलात्मक सादरीकरणातून सामाजिक जबाबदारीची जाणीव प्रभावीपणे व्यक्त झाली. या नाट्यातून समाजातील मोबाईल वापराचे दुष्परिणाम, वाढती गुन्हेगारी यावर सुंदर लघुनाटक सादर करून समाजामध्ये गुन्हेगारी, मोबाईल वापराचा अतिरेक, अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नये यासाठी स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी उत्तम रित्या जनजागृतीचा संदेश दिला. लघुनाटिकेत विविध विषय निवडले होते. त्यात मुलींच्या छेडछाडी बाबत 'उद्याची निर्भया आजच जागृत होऊ द्या', खोटा व्यवहार करणाऱ्या ठगासाठी 'आजची मदत उद्याचे आश्वासन', बालविवाह रोखण्यासाठी 'बालविवाह थांबवा भविष्य घडवा', विश्वासार्हता पूर्वक व्यवहारासाठी 'विश्वास जपा, फसवणूक टाळा', सोशल मिडीयावर बनावट ॲप, लिंकच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या फसवणुकीबाबत 'डिजीटल फसवणुकीचे जाळे आयुष्य उध्वस्त करते सगळे.' ही पाच लघुनाटके विद्यार्थ्यांनी सादर केली तर या लघुनाटिकेत पियुष चोपडे-पाटील, आर्यन हंगरगेकर, सुशांत शेटे, धैर्यशील पवार, प्रताप काकडे, अमरजित रणखांब, विवेक मांजरे, रोहन तिडके, राहुल मदने, सौंदर्या जाधवर, प्रितम बढे, वैष्णवी मेटकरी, भावना चौधरी, सारा धुमाळ, गौरी महाजन व सिद्धी चव्हाण या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. प्रत्येकांनी उत्तम अभिनयाची चुणूक दाखवली. हा उपक्रम पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मा. टी. वाय. मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला तसेच या उपक्रमास पोलीस निरीक्षक मा.वडणे हे देखील उपस्थित होते. या लघुनाट्याची पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे अधिकारी, कर्मचारी अभिमन्यू गरड, महेश निकम, मोनिका वाघे, सुवर्ण कदम, ज्ञानेश्वर गायकवाड, विकास हजारे यांनी सूक्ष्मपणे पाहणी करून विद्यार्थ्यांची ही लघुनाटीका भविष्यात गुन्हेगारी कमी करण्यास मदत करेल.' अशी आशा व्यक्त केली.



संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरींगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज एम. एम.पवार यांच्या सहकार्याने उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती, डॉ. यशपाल खेडकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे व इतर प्राध्यापकांचे या लघुनाटिकेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.